**प्रकरण सहा**

# उपसंहार - मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराचे परिणाम

महाराष्ट्रामध्ये १७ व्या शतकामध्ये मराठ्यांचे राज्य निर्माण झाले. मराठ्यांचे राज्य निर्माण करण्याचे श्रेय स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांनाच दिले पाहिजे हे नि:संशय. अलिकडे काही विद्वानांनी मराठी सत्तेच्या उदयाला फक्त शिवाजी आणि शिवाजीची कामगिरीच कारणीभूत होती असे जे म्हटले आहे ते पटणारे नव्हे. शिवपूर्वकाळात स्वराज्य निर्मितीची पार्श्वभूमी निश्चित तयार झाली होती. तिचा यथायोग्य उपयोग महाराजांनी करुन घेवून मराठ्यांचे राज्य स्थापन केले यात वाद नाही.

छ.शिवाजी महाराजांनी जे साध्य केले ते त्यांचे वडील छ.शहाजीराजे यांना प्रत्यक्षात करता आले नसेल. पण छ.शहाजी महाराजांनी दक्षिणेत जो इतिहास घडविला किंबहुना बंगलोरला जे स्वत:चे एक राज्य निर्माण केले ते बघता सरदेसायांनी छ.शिवाजी महाराजांना जी ''स्वराज्य संकल्पकाची''[१] उपमा दिली आहे ते बरोबर ठरते.

शहाजीचे मोठेपण व्यक्त करणारी व दक्षिणेचे तो संरक्षण करणारा आहे असे राधा माधव विलास चंपू काव्यातही मत व्यक्त झालेले दिसते.[२]

अर्थात शहाजीचे मोठेपण व कर्तबगारी मान्य करुन तसेच त्याच्या कार्याचा छ.शिवाजी महाराजांच्या कार्यावर जो प्रभाव पडला असेल तो मान्य करुनही शिवाजी महाराजांचे स्वराज्य निर्मितीचे कार्य मात्र एकूणच मध्ययुगीन भारताच्या इतिहासात फार मोठे आहे. म्हणून तर सभासद बखरीत म्हटले आहे की, ''मऱ्हाटा पातशाहा एवढाच छत्रपती जाला ही गोष्ट काही सामान्य झाली नाही.''[३]

सभासद म्हणतो त्याप्रमाणे खरोखरीच शिवाजी महाराजांची कामगिरी अद्वितीय होती. अंधारात चाचपडत असलेल्या मराठ्यांना संघटीत करुन आपला पराक्रम कोठल्याना कोठल्या शाहीसाठी खर्च करणाऱ्या मराठ्यांमध्ये स्वराज्याची भावना शिवछत्रपतींनी निर्माण करुन मराठ्यांचा एक स्वत्वाचा इतिहास घडवून आणला. म्हणूनच बंग इतिहासकार सर जदुनाथ सरकार त्याच्याविषयी म्हणतात, ''The greatest constructive genious of medieval India.''[४]

छ.शिवाजी महाराजांच्या काळाचा विचार करता शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराचे स्वप्न पाहिले होते का? असा प्रश्न पडतो. एक दिल्ली घ्यायचे तेवढे राहून गेले असे जे बखरकार म्हणतात, त्यावरुन शिवाजीला स्वत:चा साम्राज्य विस्तार करावयाचा असावा असे अनुमान काढण्यास जागा आहे. तथापी त्या संदर्भात कागदपत्र मात्र निदान आजतरी उपलब्ध नाहीत.

एक मात्र निश्चित की उत्तरेकडे छत्रपतींनी आपली दृष्टी वळविली नाही. मात्र १६७४ नंतर त्यांनी जो दक्षिण दिग्वीजय केला तो पहाता एक प्रकारे त्यांचा तो साम्राज्य विस्तारच होता. प्रा.ओतुरकर यांनीही मराठ्यांच्या साम्राज्य विस्तारास तेव्हापासूनच सुरुवात झाली असे मत नमूद केले आहे.[५]

तथापी छ.शिवाजी महाराजांचे कार्य स्वराज्य निर्मिती आणि त्याची जास्तीतजास्त उत्तम व्यवस्था निर्माण करणे हेच महाराजांचे मुख्य कार्य होय. ते कार्य म्हणजे स्वराज्य अधिकाधिक काळ चांगल्याप्रकारे टिकेल अशी परंपरेवर आधारित शासनव्यवस्था निर्माण करणाऱ्यावर महाराजांचा भर होता. त्यामुळे प्रत्यक्ष साम्राज्य विस्तारावर महाराजांनी लक्ष दिले नाही. उलट आहे त्या मराठी राज्यात लष्करी प्रशासन, आर्थिक प्रशासन, जास्तीतजास्त चोख ठेवण्यावर महाराजांनी लक्ष केंद्रीत केले. आपल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाण करुन देताना महाराज म्हणतात, तुम्हीं लोकांना उपद्रव देवू लागलात, त्यांच्याकडून माल किंमत न देता उपटू लागलात तर मोगल मुलखात आले त्याहूनही अधिक तुम्ही । ऐसा तळतळाट होईल..... मरठि यांची तो इज्जत वाचणार नाही.[६] स्वराज्याचे साम्राज्य व्हावे असा विचार आणि कृती याविषयी मतभेद होऊ शकतील परंतु महाराजांनी स्वराज्य निर्माण केले. त्याचे सुराज्य होण्याचे स्वप्न पाहिले व प्रत्यक्षात आणले याविषयी दुमत होऊ नये. आपल्या राज्याचा व्यापार व्यवहार वाढावा त्यायोगे आयात निर्यात व्हावी यासाठी त्यांनी व्यापाऱ्यांना आपल्या राज्यात स्थान दिले पण त्याचबरोबर त्यांचा कावाही महाराजांनी चांगलाच ओळखला होता.

आज्ञापत्रात म्हटले आहे, साहुकार म्हणजे राज्याची शोभा साहुकाराच्या योगे राज्य आबादान होते. न मिळे त्या वस्तू राज्यात येतात. ते राज्य श्रीमंत होते. तथापी पुढे जाऊन असेही म्हटले आहे की, हे युरोपीय साहुकार वरकड सावकारासारखे नव्हेत. यांचे खावंद प्रत्येक राज्यच करीत आहेत........ राज्य करणारास स्थळ लोभ नाही असे काय घडो पहाते? त्यासही हट्टी जमात आले स्थळ मेल्याने ही सोडावयाचे नाही.[७]

एकंदरीत शिवाजी महाराजांनी सामान्य माणसाचा विचार केला. प्रशासन, अर्थकारण, लोकसंग्रह, समाजकारण या सर्वच बाबतीत अत्यंत प्रागतिक विचार केला होता. हे निःसंशय म्हणूनच रियासतकार सरदेसाई महाराजांचे वर्णन करताना काळाच्या पुढे असलेला प्रतिभावान राजा असे करताना आढळतात.[८]

छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक बाबतीत पुढचे पाऊल टाकले तथापी महाराज काळाच्या पुढे होते म्हणजे काय होते? असेही विचारता येईल. याबाबतीत असे सांगितले जाते की, शिवाजी राजांनी वतनदारांची वतने खालसा केली व त्यांना वठणीवर आणले, ते मात्र बरोबर नाही. वतनदार वठणीवर आला की त्याचे वतन परत केले जाईल.[९] आज्ञापत्रात या वतनदारांविषयी म्हटले आहे. ''हे लोक म्हणजे राज्याचे दायादच. आहे वतन इत्तकियावर कालक्रमणा करावी, सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा, त्याशी निष्ठेने वर्तावे, कोणाचा अन्याय न करावा, ही त्यांची बुध्दी नाही.''[१०]

वर म्हटल्याप्रमाणे शिवाजी महाराजांनी एकदम वतने खालसा केली नाहीत. कारण वतनसंस्था ही एक त्या काळची गरज होती. मात्र हे ही खरे की, महाराजांनी उठसूट कोणालाही वतने दिली, असेही झाले नाही याबाबतीत त्यांचा जावई हरजीराजे महाडिक याचे उदाहरण देता येईल. त्याने महाराजांकडे वतन मागितले असता त्यास त्यांनी जो नकार दिला[११] तो म्हणजे महाराजांची मुत्सद्देगीर म्हणता येईल पण त्याचबरोबर नवीन स्वराज्यात नवे वतन आपल्या नातेवाईकांसही देण्यात येत नाही हे ही महाराजांनी दाखवून दिले.

महाराजांनी नवी वतने करुन दिली नाहीत. जुन्यांना मोडले नाही . तथापी हेही करताना त्यांनी आणिबाणीच्या परिस्थितीत प्रजेचे रक्षण करण्याची वतनदारांची नैतिक जबाबदारी आहे हे सांगण्यास महाराज विसरले नाहीत.

शत्रुचा हल्ला होणार अशी जासुदांनी बातमी आणली की, संबधित अधिकाऱ्यांना खलिता पाठविला जात असे. ''गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करुन लोकाची माणसे घाटाखाली जागा असेल तेथे पाठविणे या कामास घडीचा दिरंग न करणे अन्यथा तुम्हापासून अंतर पडिलिया तरी मोगल जे बांद धरुन नेतील त्याचे पाप तुमचा माथा बैसेल.''[१२]

प्रशासकीय बाबतीत, स्वराज्याचे सुराज्य करण्याच्या दिशेने जसे महाराजांनी चार पावले टाकली तसेच त्यांनी धर्म वेड्या इस्लामी सत्तांना शह देऊन हिंदूंना त्यांच्या धर्मरक्षणासाठी सज्ज केले. त्याच्या धार्मिक धोरणामध्ये धार्मिक स्वातंत्र्याचे मूलभूत तत्व अभिप्रेत होते. प्रा.सदाशिव आठवले म्हणतात,''धार्मिक आचाराचे स्वातंत्र्य प्रत्येकालाच मिळाले पाहिजे. परंतु मुसलमान, ख्रिश्चन वगैरे इतर सर्व धर्म पंथाच्या अनुयायांना ते मिळावे, येथील बहुसंख्य हिंदूना मात्र ते मिळण्याची जरुरी नाही असे मानण्या इतका शिवाजी निधर्मी नव्हता. शिवाजी असा निधर्मी नव्हता म्हणून खंत वाटण्याचे काहीच कारण नाही. तो तसा नव्हता ही या देशाच्या भाग्याचीच गोष्ट होय. [१३]

स्वधर्माच्या प्रतिष्ठेविषयी कायम जागरुक असलेला शिवाजी अन्य धर्माचे बाबतीत अत्यंत सहिष्णू होता. मुसलमानी राजवटीत हिंदूना सुरक्षितता नव्हती पण शिवाजीच्या राज्यात मात्र मुसलमानांच्या मशिदी आणि ख्रिश्चनांचे चर्च वगैरे कशालाही धक्का लागण्याची भिती नव्हती. उद्दामपणे वागणाऱ्या काही मुसलमान अधिकाऱ्यांची आणि गोव्यातील ख्रिस्ती पाद्र्यांची त्याने डोकी उडविली. पण हिंदूंशी सभ्यपणाची वागणूक ठेवणाऱ्या कोणत्याही अहिंदूना ते केवळ अहिंदू म्हणून त्याने कधीच त्रास दिला नाही.

असा हा मध्ययुगातला राजा तत्कालीन इतर राजांपेक्षा सर्वच बाबतीत वेगळा वाटतो. म्हणून तर सर जदुनाथ सरकार त्यांचे वर्णन करताना म्हणतात, "Hero as a King"[१४] आधी नेता आणि नंतर राजा अशा या "Hero as a King" महाराजांना त्यांच्या अखेरच्या दिवसात स्वराज्याची काळजी वाटू लागली होती. ती स्वाभाविक होती. कारण राजाराम महाराज वयाने लहान तर संभाजी राजे एकदा मोगलांना जाऊन मिळालेले. अशा वेळेस राज्याचे साम्राज्य तर राहोच पण राज्यच आपल्या पश्चात टिकेल की नाही असे महाराजांना वाटणे स्वाभाविकच होते. तथापी त्यावेळेस ते म्हणतात,''मोडिले राज्य हे तिघे ब्राह्मण (प्रल्हादपंत, रामचंद्रपंत, निळोपंत) व तिघे मराठे (संताजी, बहिरजी घोरपडे, व धनाजी जाधव) सावरतील.[१५]

वरील वाक्यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण ब्राह्मण मराठे यांच्यावर अधिक लोभ ठेवणारे असे होते. असे वाटण्याचा संभव नाकारता येत नाही. तथापी महाराजांनी कोणा एका विशिष्ठ जातीचा आहे म्हणून त्याचा पुरस्कार केला नाही हे मशहूरच आहे. शत्रुला सामील झालेल्या प्रभानवल्लीच्या जिवाजी विनायक सुभेदारास ''ऐशा चाकरास ठीके-ठीके केले पाहिजेत. ब्राम्हण म्हणून कोण मुलाहिजा करु पाहतो?''.[१६] असे बेधडक महाराज विचारात त्यातच त्यांचे ध्येय धोरण स्पष्ट होते.

अशा या मध्ययुगीन भारतातील महाराजांनी अनेक नवीन-नवीन उद्योग करुन स्वराज्याचे सुराज्य करण्याचा व तत्वाने राज्य चालविण्याचा उद्योग केला. त्यांच्या साम्राज्याचाच विचार करावयाचा झाल्यास त्यांनी केलेल्या दक्षिण दिग्वीजयाचाच विचार करावा लागेल. पण महाराजांवर सरकारांनी अनेक आरोप करण्यास मागे पुढे पाहिलेच नाही. त्यांच्या सुरत स्वारीला कर्नाटक स्वारीला सरकारांनी लूट असेच संबोधले आहे.[१७] तथापी सरकारांचा दावा टिकण्यासारखा नाही. कारण शिवाजी महाराजांनी लुटी केल्या पण त्यात एक सूत्र दिसते. ते सूत्र मल्हार रामराव चिटणीसाच्या राजनीतीत स्पष्ट झाले आहे. तो म्हणतो, ''संधी लक्षून शत्रू जिंकावा व शत्रुच्या प्रजा आहेत त्या तो कालपर्यंत आपल्या जाहल्या नाहीत तोवरी त्यास लुटाण्या, माराव्या त्यांचा अनेकप्रकारे करुन नाश करावा. आपल्या असे जाहल्या बरी त्यांचे पालन पुत्रवत करावे.'[१८]

चिटणीसाच्या या उक्तीचा अर्थ समजून घेण्यासाठी महाराजांच्या दक्षिण दिग्वीजयाकडे पाहता येईल. गोवळकोंड्यांच्या कुतुबशहाशी जेव्हा मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले तेव्हा त्याचे मुलुखातून जाताना प्रजेला आपल्या लष्कराचा जराही त्रास होता कामा नये असा सक्त हुकूम त्याने आपल्या सरदारांना दिला होता. प्रस्तुत ठिकाणी मराठी साम्राज्याच्या विस्ताराच्या परिणामांची चर्चा करत असताना शिवाजी महाराजांच्या आणि त्यांच्या नंतरच्या राज्यकर्त्यांमुळे दक्षिणेत काय परिणाम झाले हे नमूद करताना पगडी लिहीतात, ''कर्नाटकात मोगल आणि मराठे यांचे फार मोठे संघर्ष झाले. त्यामुळे मोगलांचा भक्कम जम असा दक्षिण कर्नाटकात बसला नाही. त्याही काळी शृंगरीचे पीठ सुरक्षित राहिले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठे दक्षिणेत चहुकडे पसरले. मराठ्यांच्या शृंगेरीनिष्ठेमुळे आणि त्यांचे साम्राज्य भारतभर पसरल्यामुळे शृंगेरीचे स्वामी हे जगद्‌गुरु म्हणून भारतभर गाजले. शृंगेरीला हा जो मान मिळाला तो मान त्या प्रमाणात बद्रीनाथ, द्वारकानाथ आणि जगन्नाथ पुरी येथील जगद्‌गुरांना मिळाला नाही. शृंगेरीचे अखील भारतीय महत्व हे अशा रितीने मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराशी निगडीत झाले आहे.[१९]

छत्रपती शिवाजी महाराज ३-४-१६८० रोजी मरण पावले आणि औरंगजेब २०-२-१७०७ रोजी पैगंबरवासी झाला. दरम्यानचा सत्तावीस वर्षाचा कालखंड अनेक संघर्षांनी भरलेला होता. शककर्त्यांच्या निधनानंतर मोगल आक्रमणाला तोंड देण्यासाठी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात जे भीषण नाट्य घडले, यशापयशाचे जे प्रसंग मराठी माणसाने अनुभवले आणि संहारक शक्तींशी लढा दिला व ज्याला त्यांनी आपला जीवन मरणाचा लढा मानले, असा तो विलक्षण इतिहास आहे. त्या सत्तावीस वर्षाच्या प्रतिकुल काळात महाराष्ट्रातील लक्षावधी भूमिपुत्रांनी धैर्याने आणि शौर्याने जो विलक्षण संग्राम केला त्याला मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द असे जे म्हटले जाते ते योग्य म्हटले पाहिजे. शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापन करण्यासाठी जेवढे श्रमसाहस करावे लागले, तेवढेच त्या स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी पुढच्या सत्तावीस वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील सामुदायिक नेतृत्वाला ते करावे लागले. त्यांनी ते केले म्हणून तर बलाढ्य साम्राज्य सत्तेविरुध्द त्या स्वातंत्र्य युध्दात मराठ्यांना अपूर्व यश लाभले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुत्र छत्रपती संभाजी राजे १६८० मध्ये सत्तेवर आले व १६८९ मध्ये त्यांचा

औरंगजेब बादशहाने खून केला. या ८/९ वर्षाच्या काळात छ.संभाजी महाराजांनी अनेक पराक्रम केले. तथापी मराठ्यांचा हा दुसरा छत्रपती अनेक अर्थांनी दुर्दैवी ठरला. खुद्द शिवाजी महाराजांच्या तालमीत वाढलेल्या काही प्रधानांचे सहकार्य त्याला मिळू शकले नाही. त्यांची त्याच्या विरोधातील कटकारस्थाने त्याच्या मृत्यूपर्यंत चालूच होती. अशाही परिस्थितीत त्यांनी मोगल बादशहा औरंगजेब याच्याशी ८/९ वर्ष प्रतिकार केला. तथापी ते पकडले गेले आणि त्यांचा बादशहाने खून केला, हे ज्ञात आहेच. छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार झालाच नाही. उलट संकोचच झाला हे तर मान्यच करावे लागेल. तथापी साम्राज्य विस्ताराच्या योजना वगैरे आखल्याचे संभाजीच्या बाबतीत कागदोपत्री नमूद नाही. या संदर्भात जदुनाथ सरकारांच्या मताचा विचार करावयास हवा. ते म्हणतात, ''सुरक्षितता असलेले आपले राज्य सोडून उत्तर भारतात जाण्याचा अव्यापारेषु व्यापार त्याने कशासाठी करावयास हवा होता?''[२०]

सरकारांच्या मताचा आणि तत्कालीन परिस्थितीचा विचार करता संभाजीचे दक्षिणेतच राहून सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज आणि मुघल शक्तींचा चांगलाच मुकाबला केला हीच त्यांची मोठी कामगिरी होय. शत्रुच आपल्या दारात येऊन ठेपला असता संभाजीराजांनी स्वराज्य वाचविण्याचाच विचार करणे व त्यादृष्टीने कार्य करणे हेच योग्य होते व तेच त्यांनी केले व ते करता करताच त्यांना मृत्यू आला. ज्या पध्दतीने त्यांचा बादशहाने खून केला किंवा संभाजी महाराजांनी ज्या धीरोदात्तपणे स्वदेश व स्वधर्म यांच्यासाठी प्राणाची आहुती दिली त्यामुळे तर खरं म्हणजे भावी काळात शत्रुशी लढण्यासाठी मराठ्यांना चेव आला हे मान्यच करावयास हवे. तथापी सरदेसाईपासून अगदी रियासतीच्या नव्या उग्र प्रकृती संभाजीच्या आवृत्तीपर्यंत ज्या अनेक लेखकांनी संभाजीवर लेखन केले आहे त्यांनी संभाजीने एकंदर राज्य बुडविले, तो गैरवर्तनी होता, व्यसनी होता असाच एकंदर सूर लावला आहे. वा.सी.बेंद्रे, कमल गोखले, पी.एस.जोशी या लोकांनी संभाजीला ऐतिहासिकदृष्ट्या न्याय देण्याचा बराचसा प्रयत्न केलेला दिसतो. तथापी जी.टी.कुलकर्णी सारख्यांना तो प्रयत्न म्हणजे संभाजीला तारुन नेणेच वाटते.[२१] प्रा.सदाशिव आठवले यांनी तर संभाजीला शिवाजीचा पहिला अपेशी वारस असेच म्हटले आहे. संभाजीच्या एकूण कार्याचे मूल्यमापन करताना ते लिहीतात, ''संभाजी धाडशी आणि शूर लढवय्या होता हे निर्विवाद. पण या गुणांचा उपयोग कीतीसा झाला? सिद्दीला आळा बसला नाही. पोर्तुगीजांना त्याने आपले पाणी दाखवले. पण त्यांची सत्ता जरासुध्दा मागे हटली नाही. औरंगजेबाने तर स्वराज्य बेचीराख करुन त्याला पकडून ठार केले. योगायोगानेही यशापयश प्राप्त होत असते हे अंशत: मान्य करुनही शिवाजी औरंगजेबाच्या कैदेतून निसटून येतो तर संभाजीला महाराष्ट्रात त्याच्या रहात्या घरात घुसून मोंगल पकडतात या दोन घटनातील विरोध जाणविल्याशिवाय रहात नाही. संभाजी स्वाभिमानी होता, शूर होता हे खरे. पण एवढ्याने शिवाजीने गाठला तो पल्ला मारता येत नाही हे त्याहूनही अधिक खरे. १६८० मध्ये शिवाजी वारला तेव्हा सर्वत्र अगदी सगळे आबादीआबाद होते असे नाही. सिद्दी, पोर्तुगीज, मोंगल हे सगळे शत्रु उरावर असतानाच शिवाजी गेला होता. पण शिवाजीने शून्यापासून सुरुवात करुन हे सगळे शत्रू भोवताली असताना एका व्यवस्थित मुलकी कारभाराच्या यंत्रणेसह

आणि सुसज्ज लष्करासह असे एक स्वराज्य निर्माण केले होते. ते संभाजीच्या हाती आले होते. शिवाजीने सिंहासन घडवून घेतले होते. त्या तयार तख्तावर संभाजी चढला होता. त्यावर बसून योग्य मार्गदर्शन करुन स्वराज्याचे कार्य पुढे नेणे हे संभाजीचे काम होते. तेवढी कुवत आणि तळमळ संभाजीत नव्हती. इ.स.१६८९ मध्ये अवघे स्वराज्य मोगलांनी व्यापले होते. बादशहाने मराठ्यांच्या घरात घुसून मराठ्यांच्या छत्रपतीचा खून केला. हे असे चित्र स्वच्छ दिसत असताना संभाजीची कारकीर्द अपेशी नाही तर काय म्हणावयाची?''[२२] प्रा.आठवले यांचे म्हणणे ऐतिहासिक कसोटीवर सत्याला बरेचसे सामोरे जाते. तथापी १६८९ मध्ये अवघे स्वराज्य मोगलांनी व्यापले होते किंवा संभाजीमध्ये स्वराज्याचे कार्य पुढे नेण्याची कुवत आणि तळमळ नव्हती हे पटणारे निश्चितच नाही. प्रस्तुत विद्यार्थ्याने परिशिष्टात दिलेल्या नकाशावरुन संभाजीने स्वराज्य संपूर्णपणे बुडविले अगर अवघे स्वराज्य मोगलांनी व्यापले हे कसे खरे नाही हे स्पष्ट होते. तसेच संभाजी राजांच्यात तळमळ आणि कुवत नसती तर ते तीन तीन आघाड्यांवर (मोगल, पोर्तुगीज, सिद्दी) लढूच शकले नसते. पण तसे झालेले दिसत नाही.

एक गोष्ट तर स्पष्ट आहे की, स्वराज्यातच तीन तीन शत्रु घुसले असताना संभाजी महाराज स्वराज्य वर्धनाऐवजी स्वराज्य संरक्षणाचाच विचार करत होते व तसा त्यांनीकरुन कृतीही केली. परंतु पुढे पुढे १६८५-८६ नंतर त्यांच्या कृतीतील जोम कमी झाला व मराठ्यांचा हा दुसरा छत्रपती मोगलांकडून ठार झाला. त्याने मोगल बादशहापुढे जो बाणेदारपणा दाखविला त्यामुळेच मराठी जनता त्याच्यावर खुष झाली. संभाजीबद्दल प्रतीकूल मते प्रकट करणारे इतिहासकार देखील संभाजीचे मृत्यूला ताठपणे सामोरे जाण्याच्या कृतीलाच पुढच्या मराठ्यांच्या सत्ता विस्ताराच्या कार्याची चेतना म्हणतात. डॉ.कदम यांनी छ.संभाजी आणि कवी कलश, असा लेख लिहीला असून या संदर्भात संभाजीस दोष दिला आहे. तसेच ज्या कवी कलशाच्या प्रेमात संभाजी नको इतका पडला होता तो औरंगजेबाला फितूर असण्याची शक्यता डॉ.कदम बोलून दाखवितात. पण लेखाचा शेवट करताना ते लिहीतात, ''एका अर्थाने अष्टप्रधानांनीच छ.संभाजीला कवि कलशाखेरीज दुसरा पर्याय ठेवला नाही. अनुभवी सरकारकुनांनी साथ सोडली. म्हणून राजकीय व लष्करी अनुभव नसलेल्या आणि प्रामुख्याने धार्मिक कर्मकांडाचीच माहिती असणाऱ्या कवी कलशाकडे छ.संभाजी आकर्षिक झाला. तथापी अत्यंत कठीण परिस्थितीत आलेल्या अपयशातून मराठ्यांना पुढील दिशा आणि स्फूर्ती दिली ती छ.संभाजीच्या धीरोदात्त बलिदानानेच.''[२३]

अशाच प्रकारचे मत प्रा.जयसिंगराव पवार यांनी व्यक्त केलेले आहे. ते लिहीतात, ''हुतात्म्याचे कार्य मरणाने संपत नाही. खरे तर त्याचे कार्य मरणानंतरच सुरु होते. कारण आपल्या बलिदानाने तो लाखो देशबांधवांना स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी चेतना देत असतो. पुढच्या अनेक पिढ्यांचे तो चेतना केंद्र बनलेला असतो. संभाजी महाराजांच्या मृत्यूने त्यांचे कार्य संपले नाही. तसे ते संपेल या आशेने औरंगजेबाने त्यांना ठार केले. पण त्याच्या आशेची निराशा झाली. महाराष्ट्रात संभाजी महाराजांचे कार्य दुप्पट चौपट वेगाने वाढले.[२४]

औरंगजेबाने संभाजीला मारणे ही घोडचूक केली. त्यामुळेच मोगल मराठा संघर्ष अधिक दाहक झाला. त्यात

बादशहाचा शेवट झाला. ही मोगल बादशाहीची शोंकातिका असली तरी ती मराठ्यांची अमर विजयगाथा आहे. या विजयगाथेचा पहिला व श्रेष्ठ मानकरी आहे छ.संभाजी राजा. डॉ.आपटे यांनीही संभाजीच्या कार्यावर भाष्य करताना वरील लेखकांसारखेच मत दिलेले आढळते. ते लिहीतात, ''संभाजी राजांचा युध्दातील धडाका त्यांच्या अतुल धैर्यास व पराक्रमास साजेसा होता. त्यांची ९ वर्षांची कारकीर्द अत्यंत धामधुमीची होती. नियतीने त्याना जीवनात यश दिले नाही. पण त्यांच्या वधाने मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दास नवचैतन्य दिले. ते शहीद झाले. जीवनात जे मिळाले नाही ते मृत्यूने त्यांना दिले.''[२५]

थोडक्यात संभाजीच्यावर टीका करणाऱ्यांनी देखील संभाजीच्या मृत्यूनेच मराठ्यांना चेव आला व ते अधिक वेगाने कार्याला लागले असाच निष्कर्ष काढलेला दिसतो. व पुढचा सर्व विशेषत: राजाराम कालीन व राणी ताराबाई कालीन मराठ्यांचा इतिहास तरी तेच दाखवितो. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. संभाजी महाराजांच्या निर्घुण वधाने भावी काळासाठी मराठे अधिक सज्ज झाले असे म्हटले तरी हेही मान्य करावयास हवे की, या दु:खद घटनेमुळे मराठे काही काळ दिगमूढ झाले. मराठी राज्याच्या अधिकाऱ्यांचे नीतिधैर्य खचून त्यांनी आपल्या हाती असलेले गड-कोट व ठाणी शत्रूच्या स्वाधीन केली. शिवाजी महाराजांनी एवढ्या जिद्दीने व कष्टाने उभारलेल्या राज्याचा संकोच मोठ्या प्रमाणावर झाला. इतका की काही काळ मरठी राज्य संपल्याचा भास परकीयांप्रमाणेच स्वकीयांनाही झाला, हेही खरेच.

संभाजी वधाच्या वेळीच राजधानी रायगडास मोगली सेनापती जुल्फीकारखान याने वेढा दिला होता. तो दिवसेंदिवस अधिक आवळत जावून गडावरील राज कुटुंबियांची अवस्था बिकट बनत चालली होती. अशा परिस्थितीत राजाराम महाराज महाराष्ट्र सोडून जिंजीला गेले व तेथून त्यांनी स्वराज्याचे रक्षण केले व मराठ्यांच्या साम्राज्याचे स्वप्नही पाहिले व उत्तरेकडे त्याच्याच काळात मराठे नर्मदोत्तर घौडदौड करु लागले.[२६] अर्थात याविषयी ग.ह. खरे यांच्यासारीख्या इतिहासज्ञानेही शंका व्यक्त केलेली दिसते.[२७] तथापी राजारामाने घोरपड्यांना पत्र लिहीलेले दि.४-६-१६९१ चे पत्र पाहिले म्हणजे राजारामाने उत्तरेची सत्ता काबीज करण्याचे त्यांच्या मनात घोळत होते हे निश्चित होते. त्या पत्रात असे म्हटले होते की, महाराष्ट्र धर्म रक्षावा हा तुमचा संकल्प स्वामींनी जाणून उभयतांस जातीस व फौज खर्चास सहा लक्ष होनांची नेमणूक चालविण्याचा निश्चय करुन दिधला असे. पैकी रायगड प्रांत व विजापूर, भागानगर व औरंगाबाद हे चार काबीज केल्यावर दर कामगिरीस पाऊण लाख याप्रमाणे एकंदर तीनलाख आणि बाकीचे तीन लाख प्रत्यक्ष दिल्ली घेतल्यावर द्यावयाचे असा निश्चय केला आहे. एकनिष्ठपणे सेवा करावी. स्वामी तुमचे बहुतेक प्रकारे चालवितील.''[२८]

राजारामाच्या वरील पत्राने खऱ्यांची शंका उरत नाही. तथापी खरेच पुढे म्हणतात की, ''राजारामाला बनारस आणि इतर हिंदू पवित्र स्थाने मुस्लिमांच्या ताब्यातून सोडवावयाची होती, हे निश्चित.''[२९]

अलिकडे ज्या फारसी साधनांची मराठी भाषांतरे प्रसिध्द झाली आहेत त्यातूनही हेच स्पष्ट होते की मराठे

राजाराम महाराजांच्या काळातच नर्मदोत्तर गेले. कृष्णा सावंत हा पहिला मराठा वीर की, जो राजाराम महाराजांच्या काळातच नर्मदोत्तर गेला.[३०] हे आम्हाला फारसी साधने सांगतात. परंतु मराठी साधनात त्याविषयी कुठेही माहिती आढळत नाही.

छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीचा विचार करता विशेषत: मराठा राज्य विस्ताराच्या बाबतीत असे म्हणता येईल की, महाराज वयाच्या १९ व्या वर्षापर्यंत कैदेतच होते. इ.स.१६८९ मध्ये संभाजीचा वध झाल्यावर ज्यावेळी त्यांना मुक्त करुन छत्रपती बनविण्यात आले त्या वेळेपर्यंत लष्करी डावपेचांचा किंवा मुलकी कारभाराचा वगैरे कसलाच अनुभव त्यांना नव्हता. कैदेतून बाहेर आल्यावर अपरिहार्यपणे त्यांना जिंजीचा आश्रय घ्यावा लागला. १६९७/९८ पर्यंत ते तिकडे एकप्रकारे बंदीवासातच होते.

तथापी याच सुमारास मराठी मुलखात एक चमत्कार घडून आला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण या चौघांनी लष्कर संघटीत करुन मोगली सेनानींना पराभूत केले. अनेकांना कैद केले. खंडण्या वसूल केल्या. त्याचबरोबर महाराष्ट्रातील मोगल-मराठा संघर्ष दूर कर्नाटक प्रांतातही गेला. तथापी तिकडे मोगलांना यश आलेच नाही.

याचे कारण राजाराम महाराजांचा सर्वांना बरोबर घेऊन काम करुन घेण्याचा स्वभाव होय. तसेच सर्वसामान्य मराठी माणसाच्या मनातील शिवाजीचा स्वराज्याचा संदेश हेच होय.

या राजाराम काळातील मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दाचे वर्णन करताना प्रा.आठवले म्हणतात, ''अकरा वर्षे निकराचा लढा झाला आणि मराठी राज्य शाबूत राहिले. राक्षसी सामर्थ्याची मोगली सत्ता ते नष्ट करु शकले नाहीत. ही कर्तबगारी एकट्या राजारामची नाही, एकट्या रामचंद्र पंताची नव्हे की, एकट्या संताजीचीही नव्हे. ती त्यांच्यापैकी कुणाचीही नाही. पण प्रत्येकाची आहे. एका अर्थाने तमाम जनतेने एका तत्वासाठी दिलेली ती झुंज होती. ते तत्व म्हणजे मराठ्यांचे सार्वभौम स्वराज्य. राजाराम आणि त्याचे सहकारी धावपळ करीत राहिले. महाराष्ट्र सोडून छत्रपती कर्नाटकात राहिला. काही काळ महाराष्ट्रात कदाचित एकही किल्ला मराठ्यांकडे राहिला नसेल, पण मराठी स्वराज्य शिल्लक होते. ते स्वराज्याचे तत्व दूरच्या जिंजीच्या किल्ल्यात शिल्लक होते. मराठ्यांचे सार्वभौम स्वराज्य म्हणजे एक जिंजीचा किल्ला एवढेच राहिले तरी बिघडत नाही. पण स्वराज्य कल्पनेचे प्राणपणाने रक्षण झाले ही इतिहासातील एक महान कथा आहे. शिवाजीचा स्वराज्याचा मंत्र कुणी विसरले नव्हते. कुणीही टाकला नव्हता. उलट स्वराज्याची हद्द हिमालयापर्यंत पोहोचण्याची आणि दिल्ली पतीसह सर्वांना जिंकण्याची भाषा बोलली जात होती. औरंगजेबाला शरण जाणे तर राहोच पण त्यालाच बड तर्फ करुन दिल्लीच्या तख्तावर जावून बसण्याची मराठ्यांची जिद्द होती.''[३१]

औरंगजेबाच्या मराठ्यांचे स्वराज्य बुडविण्याच्या दुराग्रहामुळे व औरंगजेबाने संभाजीच्या संदर्भात केलेल्या कृष्णकृत्यांमुळे मराठ्यांचे अंगचे असामान्य गुण प्रकट झाले हा स्वातंत्र्य युध्दाचा अगर राजाराम काळातील मराठ्यांच्या राज्य विस्ताराच्या धोरणाचा परिणाम म्हटला पाहिजे.

याविषयी रियासतकारांनी मोठ्या गौरवपूर्ण शब्दात मराठ्यांचे कौतुक केले आहे . ते लिहीतात, ''शिवाजीने जरी मराठ्यांचे स्वतंत्र राज्य स्थापिले तरी त्या राज्याचा विस्तार व शक्ती ही वाढण्यास वरील युध्दच पुष्कळ अंशी कारणीभूत ठरले. सर्वांवर सारखा प्रसंग गुदरल्यामुळे राष्ट्रीयत्वाची बंधने थोडी बहुत दृढ झाली आणि ज्याला इंग्रजीत टीम वर्क म्हणतात अशी जुटीने काम करण्याचीसवय लोकांस लागली. मनात आणले तर आपण महत्कृत्ये करु शकू अशी धमक व भरवसा त्याजमध्ये उत्पन्न झाला.''[३२]

मुसलमानास हार न गेलेले असे दुसरे एकही राष्ट्र हिंदुस्थानात नाही. उत्तरेतील रजपूतही पादाक्रांत झाले. पण मुसलमानांच्या एकछत्री राज्यास विरोध एकट्या मराठ्यांनी दाखविला. पुढे जाऊन रियासतकारांनी असेही म्हटले आहे की, मराठ्यांना वतनाची आसक्ती भारी आहे हे जाणून राजारामाने त्या गुणांचा फायदा करुन घेतला. वतनाच्या सनदा भराभर देऊन त्याने लोकांस बादशाहीशी लढण्यास उद्युक्त केले. अर्थात रियासतकारांनी याची भालवण केली असली तरी त्यांनी मराठ्यांच्या स्वार्थी वत वतनासक्त धोरणाचा कडक शब्दात समाचारही घेतलेला आहे. ते लिहीतात, ''अशारितीने राज्याचा विस्तार होत असतानाच अनेक अनिष्ट प्रकार राज्यकारभारात शिरले. व्यक्तीचे प्रस्थ वाढले. सामवायिक कारभारात गौणत्व आले. शिवाजीने बांधलेली शिस्त बिघडली. कामांची वाटणी नाहीशी होऊन प्रत्येक इसम पूर्ण स्वतंत्रतेने वागू लागला. मुलूख जिंकावा व तो जागीर म्हणून आपणच मारावा हा प्रघात सुरु झाला. हिंदुस्थानात ठिकठिकाणी स्वतंत्र लहान लहान राज्ये निर्माण झाली. मराठे शाहीचा बलाढ्य भपका वाढत असता अंत:शक्तीहीन होऊ लागला. या वतनांमुळेच अंदाधुंदी निर्माण झाली असेही रियासतकार सांगतात व म्हणतात, ''पाहिजे त्याने उठावे, घटकेत बादशहाकडे जावे, लगेच रामचंद्रपंतास किंवा शंकराजी सचीवास भेटावे, घटकेत छत्रपतीकडे जाऊन जिंजीस गाऱ्हाणे करावे. खरे बोलावे, खोटे बोलावे, गैरकावा समजणे, अडचण दाखवून कागद करुन घ्यावे, स्वत:चा स्वार्थ साधत असताना कोणतेही अपकृत्य करण्यास कचरु नये. असा हा अव्यवस्थित कारभाराचा मामला दहावीस वर्ष चालला. तेणे करुन शिस्त सर्व बिघडून गेली. मन मानेल तसे वागावे, कोणाचीही हुकमत मानू नये, शिवाजीची शिस्त संपली, शिस्तीचा अभाव म्हणजेच फुटीचा स्वभाव. मराठी नाशाचे हे आद्य कारण आहे.[३३]

म्हणजेच मराठ्यांचा सत्ताविस्तार राजारामाच्या काळात झाला. मराठ्यांचे अनेक गुण आणि अवगुणही त्या काळातच अधिक प्रमाणात दिग्दर्शात आले हेच खरे.

छत्रपती राजाराम महाराजांचा ऐन तिशीत मृत्यू झाला आणि पंचवीशीतील तरुण विधवा स्त्री मराठ्यांची राणी बनली. पती निधनाचे दु:ख करत न बसता तिने राज्यकारभार हाती घेऊन मराठ्यांना आक्रमक बनविले. मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराचा विचार करता १६९९ मध्ये मराठे नर्मदा पार झाले. कृष्णा सावंत हा पहिला मराठा वीर, की जो नर्मदोत्तर गेला व ही सुरुवात राजाराम महाराजांच्या काळातच झाली. तथापी मराठे खरे आक्रमक बनले ते ताराबाई काळातच.

सह्याद्रीच्या बिकट प्रदेशात आपल्या फौजा घुसवून मराठ्यांचे डोंगरी किल्ले घेण्याच्या उद्योगात बादशहा असता, ताराबाईंनी मात्र आपले सरदार बादशाही मुलखात घुसविण्या सुरुवात केली होती. माळवा, खानदेश, तेलंगण इत्यादी प्रदेशात मराठी फौजा धुमाकूळ घालू लागल्या होत्या. त्यांनी बऱ्हाणपूर, गोवळकोंडा यासारखी शहरे लुटली होती. सारांश १७०२ पासूनच ताराबाईंनी मोगली साम्राज्यावर आक्रमक पवित्रा घेतला होता.

ताराबाईच्या आक्रमक धोरणामुळे आतापर्यंत बचावात्मक लढाया करणारे मराठे आक्रमक बनले तर बचावत्मक लढाया खेळण्याची पाळी मोगली सुभेदारांवर आली होती. अर्थात असे असले तरी ताराबाईंनीही जिंकलेला मुलूख सरदारांत वाटून देण्याचे धोरण स्वीकारले. परिणामी एकेका परगण्यात दोन-दोन जहागीरदार निर्माण झाले. सर्वत्र गोंधळ माजला. या गोंधळात रयतेची स्थिती मात्र दयनीय झाली होती. तथापी अशा वेळेस बादशहा तहास तयार असे. परंतु मराठे नसत. स्वराज्यात आणि स्वराज्याबाहेर मोगलांशी लढत असता मराठ्यांच्यात नेहमीच एकजुट राहिली असे नाही. अनेक प्रसंगी त्यांच्यातील हेव्यादाव्यांनी गंभीर स्वरुप धारण केले.

अशा मराठ्यांना आपल्या धाकात ठेऊन त्यांच्याकडून राष्ट्रकार्य करवून घेण्यात ताराबाईचे खरे कर्तृत्व होते. मराठ्यांच्या अंगी असणाऱ्या शौर्य, पराक्रमादी गुणांना त्यांनी वाव दिला. मोगल मुलुखात त्यांना धाडून त्यांच्याकडून तेथे धामधुम माजविली व मोगलांची राज्यकारभार यंत्रणा उध्वस्त करण्यास सुरवात केली. मराठे गुजरात, माळवा, तेलंगणा यासारख्या दूरच्या मुलुखात यशस्वी लष्करी मोहीमा काढत असल्याचे पाहून बादशहासह सर्व मोगलांचे नीतिधैर्य खचले होते. या उलट मराठी राज्यकर्त्यांचे व लष्कराचे नीतीधैर्य वाढले होते. या नीतीधैर्याच्या जोरावरच मराठ्यांना शत्रूचे भय वाटेनासे झाले होते. पुढे अर्धशतकात हिंदुस्थानावर मराठ्यांची जी अधिसत्ता निर्माण झाली तिची बिजे या काळातील ताराबाईच्या आक्रमक लष्करी धोरणात आढळून येतात. मोगली मुलुखात धुमाकूळ घालणारे मराठे पुढे-पुढे तेथे आपले बस्तान बसवू लागले. अशाप्रकारे मराठी अधिसत्तेचा उदय ताराबाई काळातच घडून आला होता.

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूने दक्षिणेस २६ वर्ष चाललेले प्रदीर्घ युध्द संपले. मराठी राज्य एका मोहीमेत चिरडून टाकू अशी धमक बाळगून दक्षिणेत धावून आलेल्या मोगल बादशहाला मराठ्यांनी पाव शतकभर खेळविले आणि शेवटी महाराणी ताराबाईच्या नेतृत्वाखाली मराठ्यांशी लढा देत औरंगजेबाला इथेच चिरनिद्रा घेणे भाग पडले. २५-२६ वर्षाच्या एका तरुण विधवा राणीने एका रणझुंजार आणि कुटील नीतीज्ञ बादशहाशी दिलेला हा लष्करी लढा मराठ्याच्याच नव्हे तर अखिल हिंदूस्थानच्या इतिहासातील एक सोनेरी पान होय हेच खरे.

इ.स.१७०७ पर्यंत औरंगजेब आणि इतर शत्रू यांचेशी कौतुकास्पद लढा देणारी ताराबाई १७६१पर्यंत जगली. तथापी तेथून पुढे राजकारणात छ.शाहू आणि त्यांचे पेशवे यांचेच वर्चस्व निर्माण झाले. त्यातही छत्रपती मागे पडले व पेशवेच पुढे आले. त्यांनी मराठी सत्तेचा पुष्कळच विस्तार केला परंतु घटनात्मकदृष्टया राजारामानंतरचे सर्व मराठे सत्ताधीश म्हणजे दिल्लीपतीचे लहान मोठे सेवकच होते असेच म्हटले पाहिजे.

छ.शाहू महाराजांच्या काळातच १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथाने स्वराज्य चौथाई आणि सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. त्यामुळे मराठ्यांच्या विस्तारवादाला खतपाणी मिळाले. त्यातूनच संपूर्ण १८ वे शतक मराठ्यांनी गाजविले. तथापी या काळातही मराठ्यांनी प्रत्यक्ष दिल्लीचा ताबा कधीच घेतला नाही, हे अगदी स्वच्छ दिसते. याला कारण छ.शाहूची सुटका करतेवेळी त्याने जे बादशाही सेवेची अट मान्य केली होती तीच. पेशव्यांच्या काळात मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार झाला. परंतु मराठ्यांचे राज्य मोंगलांचे मांडलीक बनले व त्यास छ.शाहूची मनोवृत्तीच कारणीभूत आहे. या मनोवृत्तीतूनच शाहूने स्वत:चे नाणेसुध्दा पाडले नाही. पेशवाईत सर्व रुपये मोगल बादशहाच्या नांवाने फारसी अक्षरे कोरुन पाडण्यात येत असत.[३४]

बाळाजी विश्वनाथाने मराठ्यांना मराठी सत्तेच्या फैलावाची संधी प्राप्त करुन दिली, हे खरे. परंतु बादशहाकडून सनदा मागत बसण्यापेक्षा जिंकलेल्या प्रदेशावर मराठ्यांची सत्ता स्थापण्याचा उपक्रम ठेवला असता तर बरे झाले असते. पण तसे झाले नाही. कारण मराठ्यांची ताबेदारी मनोवृत्ती.[३५]

दुसरा एक महत्वाचा मुद्दा असा की मराठ्यानी दिल्ली घेण्याचे स्वप्न पाहिले. पण दिल्ली कधीच घेतली नाही. पहिला बाजीराव पेशवा १७३७ मध्ये दिल्लीपर्यंत गेला. परंतु तो लिहीतो ''पुन्यास आग देवून शहर खाक करावे, त्यास दिल्ली महास्थळ पातशाहा बरबाद झाली यात फायदा नाही. अमर्यादा केल्यास राजकारणाचा दोरा तुटतो.''[३६]

अशाप्रकारे बाजीरावाने दिल्लीपर्यंत जाऊनही दिल्ली घेतली नाही. तर मग त्याच्या साम्राज्य विस्ताराचा उपयोग काय? सरदेसाईसारखे इतिहासकार म्हणतात, बाजीरावाच्या साम्राज्य विस्तारामुळे हिंदू पदपातशाहीची स्थापना झाली.[३७] परंतु मराठ्यांच्या ऐतिहासिक कागदपत्रांत हिंदू हा शब्द क्वचितच वापरला आहे. रामदास स्वामींनी हिंदू धर्माचा उल्लेख केला नाही तर महाराष्ट्र धर्माचा पुरस्कार केला. अगदी स्तुतिपाठक ब्राह्मणांनीही राजा अथवा देशमुख या आपल्या धन्याचा उल्लेख हिंदू धर्म प्रतिपालक असा न करता गोब्राह्मण प्रतिपालक असा केला आहे. वसईच्या तहात बाजीरावानेसुध्दा पोर्तुगीजांनी महाराष्ट्र धर्माचे रक्षण करावे असे कलम घातले आहे.[३८] म्हणजेच सरदेसाईंचा हिंदूपदपातशाहीचा मुद्दा टिकत नाही. मग प्रश्न पडतो की, मराठ्यांनी संपूर्ण १८ वे शतक आपल्या पायाखाली घातले याचा उद्देश तरी काय होता व त्याचा परिणाम भारताच्या इतिहासावर तरी काय झाला?

पेशवे काळात स्वराज्याचे साम्राज्य झाले पण त्याच बरोबर छत्रपतींचे महत्व मागे पडून पेशवेच राज्याचे मालक बनले. अर्थात हा घटनात्मक बदल झाला असला तरी रजपूत बुंदले पठाण रोहिले आदी सत्ता मराठ्यांना मानू लागल्या. त्यांना चौथाई देऊ लागल्या. मराठ्यांचा सर्वत्र दबदबा वाढला.

दिल्लीची बादशाही सांभाळण्याची जबाबदारी स्वपराक्रमामुळेच मराठ्यांवर येऊन पडली. जिकडे तिकडे त्यांचे नांव दुमदुमु लागले. मराठेशाहीतील कर्तबगारीमुळे मराठ्यांच्याकडे हिंदुस्थानातील इतर प्रांतियांचे व राज्यकर्त्यांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. सर जदुनाथ सरकार लिहीतात, मराठ्यांना हिंदुस्थानमध्ये अद्वितीय ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले आहे. त्यांच्या अगदी अलीकडल्या पूर्वजांनीसुध्दा शेकडो लढाया मारुन धारातिर्थी आपली देह ठेवले.

व्यवस्थितरितीने मोठमोठ्या फौजांच्या हालचाली केल्या. विलक्षण राजकारणे लढविली. साम्राज्यातील राजकीय प्रश्न उलगडून दाखविले. सारांश त्यांनी आपल्या कृतीने अलीकडचा इतिहास बनविला. बुध्दीची तीक्ष्णता, दीर्घोद्योग, साधी राहणी, उच्च विचारसरणी, कोणताही विचार आचरणात आणण्याची धमक, चारित्र्य इ. सर्व गुणांचा मिलाफ मराठ्यांच्यात झालेला असल्यामुळे आजतरी हिंदुस्थानात त्यांच्यापेक्षा वरचढ कोणी असेल अशी कल्पनासुध्दा करण्याचे कारण नाही. वरील सद्‌गुण समुच्चयात जर मराठ्यांमध्ये संघटन, चातुर्य, सहकारिता, आधुनिक यांत्रिक कलेचे ज्ञान आणि आहे त्याहून अधिक दूरदृष्टी इतक्या गुणांची भर पडेल तर पृथ्वीच्या पाठीवर त्यांची बरोबरी कुणीही करु शकणार नाही. मराठे उत्तरेत, पूर्वेस, गुजरातेत, मुलखगिरी करण्यासाठी गेले होते असे म्हणण्यापेक्षा त्यावेळच्या मुसलमानी सत्तेचा जुलूम हिंदू रयतेस सहन न होऊन त्यांनी मराठ्यांना बोलाविले. त्यावरुन मराठ्यांचे राज्य गायकवाडांनी गुजरातेत, शिंदे-होळकर-पवारांनी उत्तर हिंदूस्थानात, नागपूरकर-भोसल्यांनी बंगालमध्ये वाढविले. हे राज्य वाढविण्याच्या कामगिरीसाठी या मराठे सरदारांनी आपल्या बरोबर दक्षिणेतून ज्या शूर सरदारांना नेले होते त्यांना जहांगिऱ्या आणि वतने दिली. जहांगिरीदारांना पूर्ण प्रतिष्ठा आणि महत्व प्राप्त करुन दिले. त्यामुळे मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार होत असताना मराठा मंडळाच्या राज्यकारभाराची जहांगिरीदारी प्रथा एक महत्वाचे अंग बनले.आपापल्या भाराचे एक महत्वपूर्ण अंग बनले. आपापल्या जहागीरीची अंतर्गत व्यवस्था राखण्याच्या बाबतीत ही जहागीरदार मंडळी पुष्कळ अंशी स्वतंत्र होती. या जहागीरदारांना पायदळ व घोडदळ नेहमीच तयार ठेवावे लागे. वेळ पडल्यास राज्याची सेवा करण्यास ते नेहमीच तयार असत. राजकीय आज्ञा त्यांना काटेकोरपणे पाळाव्या लागत. त्यांच्या कारकिर्दीत लोकांस चोर, दरोडेखोर यांच्या पासून अभय मिळाले. भिल्लांवरच त्यांनी यात्रेकरुंच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली. त्यामुळे यांत्रेकरुंना लुटणारे भिल्लच त्यांचे संरक्षक बनले. मराठ्यांच्या राज्याचा विस्तार होत असताना शिपाई गडी वर्षभर मुलुखगिरीवर राहत असत. त्याना मनोरंजन हवे असे. त्यातून हरदासी संस्था अस्तित्वात आल्या. शिपाई गड्याचे मनोरंजन करण्यासाठी एक तुणतुण्याच्या नादावर व तालावर नृत्यगान करणारी तमाशा ही संस्था अस्तित्वात आली. या संस्थेने समाजावर आपली पकड घट्ट बसविली. त्यामुळे लोक विलासी बनले. उत्तरेशी संबंध आल्याने तेथील संगीताचे सूर महाराष्ट्रात निनादू लागले.

मराठ्यांनी साम्राज्य विस्तार करताना राज्याच्या सांपत्तीक स्थितीची काळजी घेतली नाही. त्यावेळची जनता राजकारणातून अलिप्त होती. राजकारण हा राजे लोकांचा खेळ आहे व आपण मुके, बिचारे आहोत असेच ते मानीत होते. जनजागृती व उत्स्फूर्त जनप्रतीकार हा जवळजवळ नव्हताच उलट इंग्रज आले दरारा बसला. जीवनाला सुरक्षितता आली. म्हणून मनातले मनात प्रजा आनंदली. मराठ्यांचे इंग्रजांचे युध्द सुरु असता कलकत्याला एक जाहीर सभा झाली. त्या सभेत मराठ्यांचा पराभव व्हावा म्हणून सार्वजनिक प्रार्थना करण्यात आली. त्याचे कारण लुटारु मराठ्यांची दहशत बंगालने इतकी घेतली की, आम्हाला मुसलमान तर नकोच पण मराठे विजयी व्हावयास नकोत, इंग्रज परवडले असे कलकत्यातील स्वदेशीयांना वाटले. मराठ्यांनी स्वराज्याचे साम्राज्य करताना सर्व हिंदूंना

आपणाकडे आकर्षण्यासारखे धोरण ठेवलेले दिसत नाही. आपल्या विषयी इतर प्रांतीयात प्रेम उत्पन्न करण्यासारखे वर्तन टेवलेले नव्हते. धनाढ्य व्यापारी मराठ्यांना अनुकूल असल्याचे दिसत नाही. म्हणजे राज्यात पैशाची पैदास दिसत नाही. प्रत्येक स्वारीचा व्यवहार आतबट्ट्याचा असण्याचा संभव फार मराठ्यांच्या राज्याचे अवशेष म्हणून मुसलमानी राज्यकर्त्याप्रमाणे टोलेजंग इमारती दिसत नाहीत. ह्याचे कारण मराठ्यांजवळ पैसा नव्हता. शिवछत्रपतींनी लूट करुन खर्जाना तुडूंब भरला. तो त्यांचे चिरंजीव संभाजी राजे यांच्या काळात रिता झाला. राजाराम छत्रपतीला निर्वास्ति होऊन जिंजीस जावे लागले आणि तेथून कर्ज काढून व काही मराठी प्रदेशाची विक्री करुन निर्वाह करावा लागला. महाराष्ट्रात मराठे तळहाती शिर घेऊन औरंगजेबाशी सतत सत्तावीस वर्ष लढले. सतत धावपळीचे जीवन जगलेल्यांच्या खजिन्यात खडखडाट असावयाचाच. औरंगजेब मेल्यावर पेशवे व मराठे सरदार उत्तरेत व दक्षिणेत अनिरुध्द संचार करु लागले. तरी मराठेशाहीचा सरकारी खजीना रिताच होता. थोरल्या बाजीरावाचे सरदार कोट-कोट खजिना बाळगून होते, पण कर्जापायी त्याचे कपाळ मात्र छिनत चालले होते.[३९]

म्हणून मराठ्यांच्या पत्रातून सतत पैशाचीच भाषा केली जाते. जानेवारी १७२९ मध्ये बाजीराव पेशवा चिमाजीस लिहितो, जिकडे पैका मिळेल तिकडे जाणे. बहुतयुक्तीने चौकशीने पैका मिळविणे. माळवा प्रांत लुटून टाकणे. आम्ही छत्रसालचे मुलखात आलो आहोत, तुम्ही इकडे येऊ नये. तुम्ही तिकडे पोट भरणे आम्ही इकडे भरतो. दोन्ही लष्करे ही एका जागा होऊन पैका कैसा मिळेल?[४०] एप्रिल १७३७ मध्यें बाजीभीवराव पेशव्यास लिहितो की, तुमच्या आज्ञेप्रमाणे दुतीयेकर वगैरे राजांकडून दांडगाईने पैसे वसूल केले आहेत.[४१] मे १७३९ मध्ये चिमाजी आप्पास आलेल्या पत्रात म्हटले आहे, ''मराठी सैन्याने रामनगरच्या रयतेची चिरगूट पांघरुणेसुध्दा पळविली.''[४२] हे एवढे सर्व स्वच्छ दिसत असताना मराठ्यांच्या साम्राज्य विस्तारामागे फार मोठे ध्येय होते. हिंदूधर्म प्रसाराचा उच्च भाव होता वगैरे सारखी विधाने करणे म्हणजे ती आत्मवंचना ठरेल.

एक गोष्ट मात्र निश्चित की, मराठे पराक्रमीं होते, लढवय्ये होते, मुलुख गिऱ्या करत होते. त्यामुळे त्यांची म्हणून एक सत्ता तयार झाली. मात्र मराठ्यांचे साम्राज्य मात्र झाले नाही.

दुसरा एक महत्वाचा मुद्दा असाकी, छत्रपती शाहूच्या नेतृत्वाखाली बाळाजी विश्वनाथ आणि बाजीराव पहिला यांच्याद्वारे मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार होत होता तेव्हाही पूर्वी प्रमाणेच आपापसातील भांडणे चालूच होती. बाळाजी विश्वनाथाला चंद्रसेन जाधव, खटावकर वगैरेंचा उपद्रव तर बाजीरावाला प्रतिनीधीचा. बाजीराव दाभाडे संघर्ष तर प्रसिध्द त्रिंबकराव दाभाडेच्या बाबतीतले बाजीरावाचे वर्तन तर कधीच समर्थनीय होऊ शकत नाही.

पेशवे काळात मराठ्यांची सत्ता वाढत होती त्याच वेळेस हिंदूअंतर्गत समाजात ब्राह्मण वर्गाचे महत्व वाढत होते. त्यांना श्रावणमास दक्षिणा मिळू लागल्या. अगदी पहिल्या बाजीरावानेही १७३१ पासून ब्राह्मणास दक्षिणा दिली. त्यामुळेच शेजवलकर म्हणतात त्याप्रमाणे समाजात एक ऐतखाऊंचा वर्ग तयार झाला. त्यामुळे देशाची प्रगती न होता अधोगतीच झाली हे मान्य करावे लागते.

अर्थात असे असले तरी मराठ्यांच्या सत्ता विस्ताराने काहीच साधले नाही असे म्हणणे म्हणजे मराठ्यांच्या इतिहासावर अन्याय केल्यासारखेच होईल.

मराठ्यांचा कर्नाटकशी जो संबंध आला त्यामुळे त्यांचे ते कधी मित्र तर कधी शत्रू झाले. तर कर्नाटकातील पालेगार काही वेळेस मराठ्यांचे मांडलिकही झाले. पण मराठे तेथे गेले म्हणूनच कर्नाटकातील संस्थानिकांचे इस्लामिकरण झाले नाही. ही मराठ्यांची कामगिरी मान्यच करावयास हवी.[४४]

मराठे सरदार उत्तर हिंदुस्थानात, कर्नाटकात जेथे जेथे कायम होत, तेथे त्याजबरोबर काही महाराष्ट्रीय, ब्राह्मण कामदार असल्याने आणि त्याशिवाय त्यांचे उपाध्ये शीष्य पुराणिक, जोशी, वैद्य वैदिक, याज्ञीक, कथेकरी, हरिदास वगैरे मंडळी यावयाची व आपल्या विद्येचा व कलेचा प्रसार करीत नवीन जिंकलेल्या प्रांतात महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या शुध्द संस्कृतीचा प्रसार होत गेला आणि तद्देशीय ब्राह्मण विद्वान व सदाचार संपन्न होऊ लागले. अशा रितीने मुसलमानी आमदानीत नष्ट, भ्रष्ठ झालेल्या हिंदूंच्या पूर्व संस्कृतीचे पुनरुज्जीवन मराठी राज्याचे उदय कालापासून होत आले. मराठी अंमल जेथे कायम होई तेथील मुसलमानी अमदानीपासून अपूजित राहिलेल्या देवस्थानांचा जीर्णोध्दार होई. पूजा अर्चा, धूपदीप नैवद्य, उत्सव, यांचा बंदोबस्त होऊ लागला. देवळातून पाठ, अनुष्ठाने, सप्ताह, पारायणे, जप-जाप्य इत्यादी गोष्टी सुरु झाल्या. मुसलमानी अमदानीत नष्ट झालेल्या आचारांचा पुन:प्रचार सुरु झाला. धर्माचा जीर्णोध्दार संबंध हिंदुस्थानात मराठेशाहीमुळे होत गेला. क्षेत्राच्या ठिकाणी मोगलांनी विछिन्न केलेली देवळे, घाट, कुंड, तीर्थ इत्यादी पुन्हा कायम केले. आणि धर्मशाळा बांधून अन्नछात्रे घातली.

काशी, प्रयाग, मथुरा, उज्जयनी, इत्यादी क्षेत्री चांगले विद्वान, स्नान संध्याशील, तपस्वी ब्राह्मण बसवून त्यांना स्वास्थे करुन दिली. वाचन पठणास उत्तेजन दिले. ग्रंथलेखन चालविले. त्यामुळे दुर्मिळ ग्रंथ मिळू लागले. ते शिकून विद्वान पंडीत तयार झाले. त्यांनी क्षेत्राचे ठिकाणी संस्कृती विद्येची पीठे पुन्हा स्थापीली. त्यामुळे मुसलमानी आमदानीत सनातन धर्मास व आचारास आलेली ग्लानी दूर होऊ लागली. काश्मीर -नेपाळपासून नर्मदापावेतो सर्वत्र दक्षिणी पंडितास विशेष मान मिळत गेला.

बदरी नारायणपासून उज्जयनीच्या महांकाळपर्यंत या बाजूस अनेक छिन्न देवस्थानात पूजाअर्चा नीट चालत नव्हती. ती चांगली चालावी या करीता बहुतेक ठिकाणी कर्नाटक, तेलांगण, द्रवीड देश येथून चांगले शुध्द आचाराचे ब्राह्मण बोलावून त्यांचेकडे देवस्थानांच्या पूजे अर्चेची व्यवस्था सोपविली. कथा, किर्तने, पुराणे हे राष्ट्रीय शिक्षणाचे प्रकार महाराष्ट्रातील फार दिवसापासून चालत आले. या शिक्षण साधनातून महाराष्ट्रातील जनतेचा अतिशय लाभ झालेला आढळतो. कथा, पुराणे, नाटके, याशिवाय सर्कस, कुस्त्या इत्यादी मनोरंजन प्रधान शिक्षणाचे राष्ट्रीय प्रकार उत्तर हिंदुस्थानी रयतेने उचलले.

मुसलमानांचे वेळी ब्राह्मणांवर बरीच सक्ती होत असे. पण हिंदू राज्य सुरु झाल्यापासून सक्ती नाहीशी होऊन धर्माचरण होऊ लागले. स्वराज्य स्थापनेनंतर हिंदूंच्या देवालयावरील वक्रदृष्टी थांबली देवालयांना संरक्षण मिळू

लागले मुलुखात देव देवस्थाने जिथे होती त्यास दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविले.

मराठ्यांनी माळवा, बुंदेलखंड, उत्तरेकडील प्रदेश आणि गुजराथ या ठिकाणी आपली सत्ता स्थापन केली. वरील प्रत्येक ठिकाणी त्यावेळच्या मुसलमानी रयतेचा जुलुम त्या रयतेस सहन न होऊन त्या त्या ठिकाणच्या रयतेने त्यांना बोलाविले. त्यावेळेचे मुसलमान सत्ताधीश सत्तेने मदांध होऊन स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग करीत. दिवसाढवळ्या बलात्कार, अब्रू घेणे, ही कामे त्यांच्या हातचा मळ झाली होती. कुणबीण सुंदर स्त्रीया त्यांना त्यांच्या जनानखान्यात कुंटिण म्हणून हव्या असे वाटू लागले. याहून वरच्या वर्गालाही तोच त्रास सोसावा लागत होता. गाव पाटील, देसाई, पाटीलदार वगैरे वजनदार हिंदू लोक या छळातून मुक्त झाले नव्हते. त्यांच्या बायका, मुली वगैरेंची तीच गत होती. त्यातून मुक्त होण्याकरिता पिलाजी गायकवाडास गुजरातने बोलाविले. शिंदे, होळकर, पवार, यांना माळवा, बुंदेलखंड, दिल्ली पंजाब वगैरेच्या वतनदार लोकांनी पाचारण केले. या सर्व लोकांनी तेथे खंडण्या वसूल करुन रयतेस जीवीत, वित्त व सुरक्षिततेची हमी दिली. हिंदूंनी मुसलमान होणे थांबले. बाटगेपणा गेला.

मराठ्यांच्या सत्ताविस्ताराचा आणखी एक परिणाम म्हणजे मराठ्यांच्या संपर्कात आल्यामुळे मुसलमान राज्यकर्ते सुध्दा होळीसारखा मोठा सण मोठ्या उत्साहाने साजरा करीत आणि आपल्या हिंदू प्रजेच्या आनंदात सहभागी होत. गावोगावी होळीचा सण साजरा होई. त्याचप्रमाणे प्रत्येक गड किल्ल्यावरही होळीचा समारंभ साजरा होई. रंगपंचमीच्या दिवशी मात्र एक खास दरबार भरवून मोठा रंगसोहळा साजरा करण्यात येई. हुजऱ्यापासून हुजुरांपर्यंत सारे लहान थोर ह्या समारंभात रंगून जात.[४५] हा मराठी सत्तेच्या विस्ताराचा परिणाम म्हणून मान्यच केला पाहिजे. तथापी प्रा.आठवले यांच्यासारखे इतिहासज्ञ मराठ्यांचा इतिहास म्हणजे फक्त शिवाजी आणि शिवाजीचाच इतिहास असे म्हणून मराठ्यांना शिवाजीपूर्वीही इतिहास नव्हता आणि शिवाजी नंतरही नाही. मराठ्यांचा इतिहास म्हणजे फक्त शिवाजी आणि शिवाजीच असे जे म्हणतात[४६] ते फारच एकांगी वाटते.

तथापी १९७१ मधील हे प्रा.आठवले यांचे मत जरा बदललेले दिसते. मराठ्यांच्या इतिहासाविषयी ते लिहितात,''मराठ्यांचा इतिहास म्हणजे प्रारंभी स्वराज्य मिळविण्याकरिता, नंतर काही काळ ते टिकविण्यासाठी आणि त्यापुढे त्या स्वराज्याचा हिंदुस्थानभर विस्तार करण्यासाठी दिलेल्या, त्या सत्तेच्या स्थापनेपासून तर अखेरीपर्यंत केव्हाही न थांबता चालू राहिलेल्या लढ्यांची एक प्रदीर्घ कथा आहे. पुढे जाऊन ते म्हणतात,''बाजीरावाच्या काळात काय किंवा अगदी शिवाजीपासून मराठी सत्तेच्या अखेरी पर्यंत, मराठ्यांच्या इतिहासात फक्त मोहिमांमागून मोहिमाच आहेत. असे असले तरी त्यामुळे मराठ्यांनी काही इतिहास घडविलाच नाही असे मुळीच म्हणता येणार नाही. अशीही कधी काळी जी गरज निर्माण होते की, जेव्हा फक्त लढायाच करणे प्राप्त होते. त्यातून भरीव अशी निर्मिती पुढे होऊ शकते. किंवा तशी झाली नाही तरी निदान संभाव्य असे एखादे संकट परतविलेले असते हे निश्चित.

शाहू आणि पेशवा बाळाजी विश्वनाथाच्या निर्धाराने मराठी सत्तेची उभारणी बरीचशी व्यवस्थित अशी झाली होती. त्या पेशव्याने पूर्णपणे नाहीतरी बऱ्याच यशस्वीपणे मराठ्यांना संघटीत करुन, रणांगणावर आणून उत्तरेची

दिशा दाखविली होती. तथापी, त्या दिशेने हिंमतीने आणि वेगाने पुढे जाणे आवश्यक होते. आणि तसेच इतर दिशांना ही हातपाय पसरणे आवश्यक होते. क्रमप्राप्त अशी ही कामगिरी बाजीरावाच्या अंगावर पडली. आणि त्याने दोन दशके समर्थपणे सांभाळली.

औरंगजेब हा शेवटचा कर्तबगार मोगल सम्राट त्याच्यानंतर इ.स.१७०७ ते १७२० या काळात मोगल बादशाही ढासळल्याचे चित्र स्पष्ट झाले होते. इ.स. १७२० मध्येही तख्तावर असलेला महंमदशाहा किंवा त्याच्या नावे किंवा त्याला हुसकावून आणखी कोणी तरी बादशाही पुन्हा समर्थपणे उभी करील असे दिसत नव्हते. पण याचा फायदा उठवायला कित्येक यवन पुढे सरकण्याचा धोका निर्माण झाला होता. या संधीत मराठे पुढे सरसावले. बाजीरावाच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानच्या राजकारणाची सूत्रे सगळी नाही तरी बरीचशी त्यांनी हाती घेतली. सत्तेचा मामला पुष्कळसा हिंदूंच्या हाती आला. आता पेशवा, शिंदे होळकर आदी करुन हिंदू सत्ताधीश प्रदेशात काही फार मोठी क्रांती करणार होते असे नाही. पण देशाच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशात प्रजेचे धार्मिक स्वातंत्र्य अबाधित राहणार होते. हिंदूची पोथ्या, शिल्पे सुरक्षित राहणार होते. अर्थात गरीब जनतेला युध्दाच्या झळा पोहोचणारच होत्या. पण त्या बाजीराव काय किंवा निजाम काय कोणाच्याही मोहिमा निघाल्या असत्या तरी त्या चुकणार नव्हत्या. परंतु बाजीराव आणि त्याचे सरदार यांचेऐवजी कुणा असहिष्णू, धर्मांध जुलमी मुसलमानांचे हाती भारतीय राजकारण जाते तर येथील बहुसंख्य हिंदू जनतेच्या दृष्टीने ती फार मोठी आपत्ती झाली असती. बाजीरावाने ठरवून निर्धारपूर्वक आणि ध्येय निष्ठेने हिंदुपदपातशाहीचे काम हाती घेतले असा दावा करता येणार नाही. परंतु अगदी वैयक्तीक महत्वांकाक्षेनेच बाजीराव आणि त्याचे साथी लढले असले तरी एखाद्या नव्या संभाव्य मुसलमानी सत्तेचा प्रसंग टळला हे खरेच. [४७]

प्रा.आठवले यांचे वरील मत काही अंशी खरे मानता येईल. पण सर्वस्वी मानता येणार नाही. कारण त्यांचे मत हे Hypothetical म्हणजे एका गृहीतावर आधारलेले दिसते. आणि ते गृहीत म्हणजे मराठी सत्तेचा विस्तार म्हणजे हिंदू-मुसलमानांतील झगडा होय. आणि दुसरे गृहीतक म्हणजे मुसलमानांचे सर्व काही वाईटच. आणि मुसलमान राजेही वाईटच. तथापी, एकूण मध्ययुगीन भारताचा इतिहास पाहिला तरी मराठ्यांचा झगडा केवळ मुसलमानांशीच नव्हता. अगदी शिवाजीपासून ते पुढे दुसऱ्या बाजीरावाच्या काळापर्यंत अनेकवेळा हिंदू विरुध्द हिंदू लढल्याचीही अनेक उदाहरणे आहेतच.

मराठ्यांचा साम्राज्य विस्तार होत असताना विशेषत: बाळाजी विश्वनाथापासून हिंदूंच्या मध्ये असलेला वरीष्ठ ब्राह्मण समाज विशेषत: चित्पावन ब्राह्मण यांनाच अधिक मानमरातब मिळू लागला. सर्वसामान्य हिंदू समाज पूर्वी होता तिथेच राहिला. पेशवे राज्याचे मालक बनले व छत्रपती मागे पडले. पेशव्यांच्या मुळेच रास्ते, पेठे, भानु, पुरंदरे, पटवर्धन इ. घराणी पुढे आली.

बाजीराव किंवा त्याच्या वंशजांनी केवळ हिंदू धर्माचा कैवार घेवून काही केले म्हणावे तर तसेही दिसत नाही. कारण शिवाजीने दक्षिण दिग्वीजयानंतर तिकडील मुसलमानांनी भ्रष्ट केलेली देवळे पुन्हा बांधून हिंदू धर्माच्या

पुनरुज्जीवनाचा उपक्रम चालू ठेवला होता. तसेच औरंगजेबाला जिजीया कराराबद्दल खरमरीत पत्र लिहीले होते, ते सर्वज्ञात आहे.

तथापी बाजीरावापर्यंत तरी असे कोणी काही केल्याचे नमूद नाही. उलट पेशवाईत टोक्याची देवळे व पुण्याची पर्वती भ्रष्ट करणाऱ्या निजामाला कोणतेही शासन झाल्याचे दिसत नाही. शिवाजीने जसा राज्यव्यवहार कोष तयार केला तसाही काही उपक्रम पेशव्यांनी केलेला आढळत नाही.[४८]

त्यामुळे प्रा.आठवले यांचे वरील हिंदूधर्माविषयीचे मत लटके पडते.

बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांच्या उत्तरेकडे जाण्याच्या धोरणामुळे दक्षिण मोकळे सुटले व तेथे इंग्रज, फ्रेंच इ. पाश्चिमात्यांनी डोके वर काढण्यास सुरुवात केली. त्यामुळे मराठी राज्याचे नुकसानच झाले.[४९]

उत्तरेकडे गेलेल्या हिंदूंनी ठिकठिकाणी केलेल्या मुलुखगिरीमुळे कळत नकळत हिंदू शेतकऱ्यांवर दुष्परिणाम झाले. मराठ्यांच्या चौथाई गोळा करण्याच्या पध्दतीमुळे शेतकऱ्यांवर शेतसाऱ्याचा बोजा पडून मराठा राजवट तिकडे अप्रिय ठरत गेली. पण त्याचबरोबर हेही लक्षात घ्यावे लागेल की, काही ठिकाणी मराठा सरंजामदारांनी चांगले प्रशासनही त्या त्या भागात दिले. दुसरा एक महत्वाचा परिणाम म्हणजे, मराठ्यांच्या लढायांसाठी आवश्यक असलेला पैसा ते खाजगी सावकारांकडून घेऊ लागल्याने महाराष्ट्रात काही सावकार उदयास आले. त्याचप्रमाणे उत्तरेकडच्या शिख, जाट, रजपूत इ. सर्व हिंदूंनी मराठ्यांपासून स्फूर्ती घेवून आपापल्या भागात मुघल सत्तेविरुध्द उठाव केले. त्यामुळे मुघल सत्ता खिळखिळी होण्यास मदत झाली.

थोडक्यात मराठ्यांच्या सत्ता विस्ताराचे केवळ चांगले अथवा केवळ वाईटच परिणाम झाले असे कोणालाही म्हणता येणार नाही. तथापी, सतराव्या शतकानंतर ज्या तडफेने आणि ज्या वेगाने मराठी सत्ता वाढत होती त्यामुळेच १७६१ पर्यंत सतत मराठ्यांचा दबदबा निर्माण झाला आणि एक विशिष्ट काळ हा संपूर्ण हिंदूस्थानच्या इतिहासात मराठ्यांचा काळ म्हणून ओळखला जाऊ लागला ही त्यांच्या प्रदेश विस्ताराची फलश्रूती होय.

## ***संदर्भ टीपा***

१) म.री., खंड १, पृ. १७

२) वि.का.राजवाडे (संपा.) राधा माधव विलास, पुणे १९८९, पृ. २५० (दु.आ.)

३) स.रा.गाडगीळ (संपा), स.ब., पुणे १९६०, पृ. १०५

४) J.Sarkar, "Shivaji and his times" Calcutta 1919, p. 496

५) कुलकर्णी आणि खरे (सं.), मराठ्यांचा इतिहास, खंड २, पृ. २३५-३६

६) राजवाडे (सं.), म.इ.सा., खंड ८, लेख २८

७) प्र.न.जोशी, (संपा), आज्ञापत्र, पुणे १९६९, पृ. २४-२५ (दु.आ.)

८) G.S.Sardesai, New History of the Marathas, Bombay 1971, p. 297-99

९) अ.रा.कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पुणे १९९३, पृ. ४४

१०) प्र.न.जोशी, उपरोक्त, पृ. २६

११) शं.ना.जोशी, ग.ह.खरे, शिवचरित्र साहित्य खंड ३, पुणे १९६०, लेख ४३८

१२) राजवाडे, म.इ.सा., खंड १५, लेख २७६

१३) सदाशिव आठवले, शिवाजी आणि शिवयुग, पृ. १४९

१४) J.Sarkar, Shivaji and his times, p. 486

१५) स.रा.गाडगीळ उपरोक्त, पृ. १२८

१६) राजवाडे, म.इ.सा., लेख ३१

१७) J.Sarkar, Shivaji and his times, p. 110-3, 218-28

१८) प्रमोदिनी जुवेकर, संपा, चिटणीस बखर, पुणे १९६३, पृ. ५०

१९) सेतुमाधवराव पगडी, महाराष्ट्र कर्नाटकातील सुवर्णकाळ, मुंबई १९९०, पृ. १६१-६२

२०) J.Sarkar, History of Aurangjeb, Vol.4, p. 283

२१) गो.त्र्यं.कुलकर्णी, (संपा), मराठी रियासत खंड २, विभाग संपादकाचे मनोगत, पृ. २

२२) आठवले उपरोक्त, पृ. १७

२३) जयसिंगराव पवार, (संपादक), संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. १५९-७१

२४) कित्ता, प्रस्तावना, पृ. ९५

२५) कित्ता, पृ. २४६

२६) पगडी, मो.म., पृ. १४३

२७) G.H.Khare, Select Articles, Poona 1962, p. 111

२८) राजवाडे, म.इ.सा., खंड ५, ले.६

२९) G.H.Khare, Op.Cit., p. 111

३०) मो.म., पृ. १४३

३१) आठवले, उपरोक्त, पृ. १८

३२) म.री., खंड २, पृ. ३१६

३३) कित्ता, पृ. २४२-५

३४) त्र्यं.शं.शेजवलकर, पे.नी.सं., पुणे १९६३, पृ. १३-२२

३५) H.N.Sinha, Rise of Peshwas, Alahabad 1954, p.120

३६) पे.द., खंड १५, पृ. ४८-४९

३७) म.री., खंड ३, पृ. २७१-६२२

३८) पिसुर्लेकर, पो.म.सं., पृ. २०१

३९) वि.गो.खोबरेकर, मराठी अंमलाचे स्वरुप, कोल्हापूर १९८८, पृ. १०६-९

४०) पे.द., खंड १३, लेख ३३

४१) कित्ता, खंड १५, ले.४०

४२) कित्ता, खंड ४०, ले. १४

४३) शेजवलकर, उपरोक्त पृ. ३३

४४) कुलकर्णी आणि खरे, मराठ्यांचा इतिहास, खंड १, पृ. ४७७

४५) खोबरेकर, उपरोक्त, पृ. ८८, ८९

४६) आठवले, उपरोक्त, पृ. २०६

४७) म.री. खंड ३, विभाग संपादकाचे मनोगत, पृ. २०३-५

४८) शेजवलकर, उपरोक्त, पृ. १५६

४९) कित्ता, पृ. २७